
ISSN : 2393-8900
IMPACT FACTOR : 1.9152 (UIF)
Historicity
International Research Journal
VOLUME-IV JAN.2018
UGC
APPROVED
SPECIAL ISSUE
Theme
Contemporary History and
Research Methodology

# Index


| | | |
|---|---|---|
| 1 | **The Importance of Cultural Heritage in India**<br>Dr. Khairdi I.M. | 11 |
| 2 | **The Cultivators Whipcord: An Indicator of the Dual Economic Drain of the Farmers**<br>Dr. Ajaykumar Pralhad Lokhande | 15 |
| 3 | **Hundred years of champaran Satyagraha**<br>Dr. Raghunath D. Shelke | 19 |
| 4 | **HISTORY OF NATIONAL LIBRARY CALCUTTA**<br>Mr. Rishi S. Gajbhiye | 23 |
| 5 | **The Art of Ancient Ship**<br>Dr. Javed Tamboli, Dr. Ashok mane | 27 |
| 6 | **A STUDY OF FEMINIST ACTIVISM IN INDEPENDENT INDIA**<br>Anisha Srivastava | 29 |
| 7 | **The politics of 'conservation' : A study of environmental history during colonial times**<br>Ms. Nishtha Srivastava | 32 |
| 8 | **सोलापूर शहरातील मध्ययुगीन कालखंडातील मुस्लिम धार्मिक स्थळे**<br>डॉ. अमिता सोपान जावळे | 35 |
| 9 | **कर्मवीर दादासाहेब गायकवाड व सामाजिक विषमतेविरुध्द व्यक्तिगत चळवळी**<br>Dr. Waghmare Vishnu Babruvan | 41 |
| 10 | **मध्ययुगीन धार्मिक इतिहासातील भक्ती चळवळीचे समकालीन महत्व**<br>प्रा.डॉ.क्षीरसागर सुनिल भाऊसाहेब | 43 |
| 11 | **सम्राट अशोकाचा 'धम्म'**<br>प्रा.डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत | 46 |
| 12 | **सावंतवाडी संस्थानातील प्रजा परिषद व संस्थानचे विलिनीकरण**<br>प्रा.डॉ.एस.पी. शिंदे | 49 |
| 13 | **छत्रपती संभाजी महाराजकालीन मराठे - पोर्तुगीज संघर्ष**<br>प्रा.डॉ.राजेंद्र गायकवाड | 52 |
| 14 | **समकालीन इटालियन प्रवासवर्णने : मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे प्राथमिक संदर्भ साधने**<br>Dr. PANKAJKUMAR SHANKAR PREMSAGAR | 56 |
| 15 | **श्रीमंत मालोजीराजांनी कोरडवाहू आणि भूमिहीन शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य**<br>प्रा.डॉ.एस.एम.गावडे | 60 |
| 16 | **मध्ययुगीन मुस्लीम इतिहासलेखनातील समकालीन इतिहासकारांचा वस्तूनिष्ठ दृष्टीकोन :- एक मिमांसा**<br>श्री.मराळ ए.एम. | 62 |
| 17 | **समाजसुधारणा व प्रबोधन चळवळीचे समकालीन महत्त्व: एक तात्त्विक चिंतन**<br>श्री.नरवाडे बालाजी मारोतराव | 69 |
| 18 | **महाड तालुक्यात बौध्दकालीन पाले लेणीचा अभ्यास**<br>डॉ.भानुदास पोंडिबा शिंदे | 72 |
| 19 | **इरळी (जि. सांगली) येथील प्राचीन मंदिर व सुरसुंदरी**<br>श्री. सचिन पांडूरंग शिंदे | 75 |
| 20 | **कासेगाव परगण्यातील मंदिर स्थापत्यकला: एक अभ्यास**<br>प्रा. साळुंखे यु. ए. | 78 |
| 21 | **स्त्रीवादी, लिंगभाववादी इतिहासलेखन**<br>डॉ. तुकाराम नारायण शिंदे | 80 |
| 22 | **FEMINISM : A LITERARY MOVEMENT**<br>Dr. Anupama Prakash Pol | 8[illegible] |

ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Historicity International Research Journal SPECIAL ISSUE
Contemporary History and Research Methodology

# सम्राट अशोकाचा 'धम्म'

**प्रा.डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत**
सहाय्यक प्राध्यापक
शिवाजी विद्यापीठ संलग्नित शंकरराव जगताप आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
वाघोली. ता.कोरेगांव, जि.सातारा. (मोबा.९०९६६४११८९)
jaypalsawant@gmail.com

प्राचिन भारताचा इतिहासात मौर्य घराण्याचा एक महत्वपूर्ण राजवंश म्हणून उल्लेख करण्यात येतो. या आंतरविद्याशाखीय चर्चासत्रात मी सम्राट अशोकाचा 'धम्म' हा शोधनिबंध मांडू इच्छितो.या शोधनिबंधाव्दारे मी सम्राट अशोकाच्या धार्मीक कल्पना व त्याच्या धर्माचे स्वरूप मांडून सम्राट अशोकाचा धम्म या संकल्पनेवर प्रकाश टाकू ईच्छितो. ''इतिहासाच्या पानापानात गर्दी करून बसलेल्या, उपाधी प्राप्त केलेल्या हजारो श्रेष्ठ सम्राटांच्या अग्रभागी सम्राट अशोकाचे नाव एखाद्या ता-याप्रमाणे चमकत राहील.'' एच.जी.वेल्स यांचे सम्राट अशोकाविषयीचे हे उद्गार सार्थ आहेत. सम्राट अशोकाच्या एकूण कारकिर्दीमुळे जगातील कोणत्याही श्रेष्ठ सम्राटाच्या तुलनेत त्याचे स्थान उच्च राहीले आहे. योध्दा, विजेता, शासक, धर्मप्रसारक आणि प्रजापालनतत्पर राजा अशा अनेकाविध उपाधिंनी त्याचे व्यक्तिमत्व अलंकृत झालेले होते.जनकल्याणकारी प्रशासनव्यवस्था सुरू करून त्याने भारतभर विखूरलेल्या आपल्या साम्राज्याचा गाडा यशस्वीपणे हाकला. त्याच्या या अव्दितीय कार्याची माहीती त्याच्या आलेखांमधून मिळते.

**गौतम बुध्द आणि बुध्द धम्म/ धर्म :**

धर्म आणि धम्म या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. धर्म या संस्कृत शब्दाचे सम्राट अशोकाने प्राकृत भाषेत रूपांतर करून धम्म बनवले आणि धम्माला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे कार्य केले. इसवीसन पुर्व सहाव्या शतकातील ब्राम्हणधर्मातील कडव्या अंधश्रध्दा, मोठया प्रमाणावर होणा-या प्राणिहत्येच्या तसेच अनेक वाईट रूढी-परंपरांच्या विरोधात जैन व बौध्द धर्मांनी आवाज उठविला. गौतम बुध्दांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांमधून बौध्द धर्माचे तत्वज्ञान साकार झाले. वेद उपनिषदांनी सांगितलेला मानवी जिवनातील अंतिम सत्याचा शोध वेगळ्या पध्दतीने घेण्याचा मार्ग बुध्दाने सांगितला. हा मार्ग वैदिक कर्मकांड व उपनिषदामधिल क्लिष्ट ज्ञानमार्गाऐवजी 'सदाचरण' यावर भर देणारा असल्याने बहुजन समाजास तो आपला वाटू लागला. बौध्द धर्माची काही प्रमुख वैशिष्टे आपण पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**अ. बौध्द त्रिरत्ने**

१. प्रज्ञा : लोककल्याणकारी बुध्दी
२. शिल : चारित्रसंपन्न जीवन
३. करूणा : इतरांना सहाय्य करण्याची प्रवृत्ती

**ब. आर्यसत्य**

१. दुःख
२. दुःख समुदाय
३. दुःख समुदायनिरोध
४. दुःख समुदायनिरोधगामिणी

**क. अष्टांग मार्ग**

१. सम्यक दृष्टी
२. सम्यक संकल्प
३. सम्यक वाणी
४. सम्यक कर्म
५. सम्यक प्रयत्न
६. सम्यक चिंतन
७. सम्यक स्मृती
८. सम्यक समाधी

**ड. निर्वाणप्राप्तीचा मार्ग : मध्यम मार्ग**

पंचशिल तत्वे : १. अहिंसा २. सत्य. ३. अस्तेय ४. अपरिग्रह ५. ब्रम्हचर्य

**सम्राट अशोकाचा धम्म :**

सम्राट अशोकाचा 'धम्म' हा संस्कृत 'धर्म' याचे प्राकृत रूप आहे. संदर्भावरून त्याचा अर्थ वैश्विक नियम अथवा सदाचार अथवा विस्तारित अर्थ, जेथे ब्राम्हणधर्म हाच निकष आहे तेथे समाजात आढळून येणारी सामाजिक व धार्मिक व्यवस्था हा अर्थ अभिप्रेत आहे. बौध्द धर्मग्रंथामधून तो शब्द 'बुध्दाची शिकवण' या अर्थी वापरला जातो परंतू या शब्दाला

साजेसाही अधिक अर्थ त्या काळी होता आणि त्याच्या (सम्राट अशोकाच्या) आज्ञापत्रात ज्या प्रकारे तो वापरला आहे
त्यावरून सम्राट अशोक त्यास व्यापक अर्थ देतो असे समजते.[२] डॉ.बी.आर.आंबेडकर 'धर्म' आणि 'धम्म' याच्यातील भेद
स्पष्ट करताना आपल्या 'Buddha & His Dhamma' या ग्रंथात 'धम्म' म्हणजे म्हणतात की, "To maintain Purity
of life is Dhamma. To reach Perfection in lifeis Dhamma.To live in Nibbana is Dhamma. In
Dhamma there is no place for prayers, Pilgrimsges, rituals, ceremonies, sacrifices ets. Morility
in Dhamma arises from the necessity for man to love man.........[३] धर्म संकल्पना स्पष्ट करताना पुढे
डॉ.आंबेडकर म्हणतात, "The concept of religion consist of God, Soul, Prayers, Worship, rituals,
ceremonies and sacrifices.......... Every religion Preaches Morality in the Fuctioning of religion
is therefore casual and occasional."[४] सम्राट अशोक स्व:ताची वैयक्तिक श्रध्दा आणि बौध्द धर्माला आश्रय व
राजा आणि मुत्सदी म्हणून येणारे उत्तरदाईत्व यामध्ये भेद करतो. यामुळेच सम्राट अशोक सर्व धर्मांचा आदर करावा यावर
भर देतो. सम्राट अशोकाच्या काळात देवोपासक ब्राम्हण, गोशालाचा आजिविक पंथ, जैन निग्रंथ आणि बौध्द धर्माचे अठरा
पंथ अस्तित्वात होते. आणि या सर्वांमध्ये कठोर मतभेद होते. या परिस्थितीतही सम्राट अशोकाने कोणत्याही एका धर्माची
पाठराखण न करता सर्व धर्मातील चांगल्या तत्वांचा स्वीकार करून आपली धर्मनिती अमलात आणली. धार्मिक सलोखा
निर्माण करूण सहिष्णुतेचे धोरण स्विकारले. सम्राट अशोक वारंवार स्पष्ट करतो की, गुलाम आणि कर्मकर यांना योग्य तो
मान, गुरूजनांचा आदर, आईवडीलांचे आज्ञापालन, मित्र परिचित आणि आप्तजनांबद्दल उदारता, ब्राम्हण आणि श्रमण यांना
सन्मान व ज्ञान, प्राणीमात्रांबद्दल कळकळ आणि हिंसेपासून निवृत्ती घेणे गरजेचे आहे.

सम्राट अशोक म्हणतो, ''परंतू सर्व धर्मांच्या मौलीक प्रगतीसाठी त्या धर्माला सन्मान, दान महत्वाचे आहेत असे देवांना
पिय (राजा) मानीत नाही. त्याचा पाया म्हणजे आपल्या वाणीवर नियंत्रण ठेवणे, म्हणजे आपल्याच धर्मांची स्तुती न करणे
होय. प्रत्येक वेळी प्रत्येकाने परधर्मांचा आदर केला पाहीजे कारण त्यामुळे तो आपल्या धर्मांची प्रतिष्ठा वाढवतो आणि
दुस-याच्या धर्माचे हित करतो. याविरूध्द वागल्यास तो आपल्याच धर्माचा प्रभाव कमी करतो आणि दुस-याच्या धर्माला
दुखवतो म्हणून वाक् संयम आवर्जून करावा म्हणजे एक दुस-या धर्मांची तत्वे ऐकून घेईल![५] सम्राट अशोक आपल्या प्रजेला
आचरणात आणण्यासाठी पुढील आचारधर्म सांगतो. अपिचिती(पूज्य बुध्दी), संप्रतीपत्ती(समन्वय दृष्टी), सचेय (सत्य),
सोचय(चित्तशुध्दी), दधभक्ती (साधूवृत्ती संयम), पटिवेसा (आत्मनिरीक्षण), मदौ(माधुर्य किंवा नम्रता) आणि परोपकार,
कृतज्ञता, सेववृत्ती, औदार्य, अहिंसा, दया, दान, शिल व शांती या सद्गुणांची मनुष्यात वृध्दी व्हावी. क्रोध, निष्ठूरता,
दुष्टबुध्दी, परपीडा, स्वार्थ, अहंकार व ईर्षा या दुर्गुणांचा नाश करावा असे तो सांगतो.वडीलमाणसांच्याविषयी आदरभाव,
कनिष्ठांच्या विषयी सहानुभूती, परमताविषयी सहिष्णूता बाळगा, ढोंगी समारंभ, पोकळ संस्कार व भपकेबाज विधी निरर्थक
असल्याने त्याचा त्याग करा. या जन्मातील कर्माप्रमाणेच परलोकात सुख:दुखे (स्वर्ग-नरक) प्राप्त होतात म्हणून भावी
सुखासाठी प्रत्येकाने सद्‌वर्तनी व्हावे. या धर्माचरणाने पुण्यप्राप्ती होते.''

सम्राट अशोकाच्या धम्मामध्ये अहिंसा हे एक महत्वाचे तत्व होते. युध्दत्यागासोबतच प्राणीहत्येवर बंधनाचा त्यामध्ये
समावेश होतो. मात्र सम्राट अशोक अहिंसेबाबत अत्यंत आग्रही नव्हता, धम्माच्या मार्गावर चालत असतानादेखील उद्दंड
आदीवासींना दंड करण्यास तो मागेपुढे पाहत नाही. भविष्यात आपल्या वारसदारांना बळाचा वापर करावा लागू नये अशी
आशा तो व्यक्त करतो मात्र जर बळाची गरज पडल्यास हे कार्य अधिकाधीक दया व सहानुभूतीने व्हावे असे मत तो मांडतो.
याविषयी डॉ.रोमीला थापर आपल्या 'भारत का इतिहास' या ग्रंथात म्हणतात, ''युध्द से उत्पन्न होनेवाली व्यापक शारीरिक
और मानसिक पीड़ाओं का बहुत मर्मस्पर्शी चित्रण करके सम्राट एक अनुच्छेद में घोषीत करता है कि वह 'धम्म' का पालन
करते हुए भविष्य में वह शक्ति के प्रयोग से विरत रहेगाअ वह यह भी कहता है की उसके उत्तराधिकारी शक्ति के बलपर
विजय प्राप्त ना करें तो बेहतर होगा, किंतु यदी उन्हे ऐसा करना पडे.तो वह आशा करता है कि इस विजय का संचालन
अधिकतम दया और सहृदयता के साथ किया जाएगा.''[६] प्राणिहत्येवर बंदी घालणारा सर्वात पहिला राजा म्हणून सम्राट
अशोकाला ओळखले जाते. त्याने राजमुदपाकखान्यातील मांस शिजवण्यासाठी - थोडे हरणाचे व मोराचे मांस वगळता-
मर्यादा घातली स्पष्टपणे ती त्याची आवड होती. त्याने एका यादीत पशु आणि पक्षी व विभिन्न जातींचे मासे यांच्या हत्येवर
बंदी घातली. काही प्राणीहत्येवरील बंदी हे वर्षातील काही विशिष्ट दिवसांसाठी होती.

सातव्या स्तंभालेखात सम्राट अशोक दावा करतो की, ''प्राणी आणि मानव यांना छाया मिळण्यासाठी रस्त्यांवर मी
वटवृक्ष लावून घेतले आहेत. मी आमराईची लागवड केली आहे. रस्त्यावर दर नऊ मैलांच्या अंतरावर विहिरी खणल्या
आहेत. विश्रामगृहे बांधली आहेत. प्राणी आणि प्रवासी यांच्यासाठी सर्वत्र पाणपोया सुरू केल्या आहेत. हा लाभ महत्वाचा
आहे यामुळे पूर्वीचे राजे व माझ्याकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. माझ्या प्रजेने धम्माचे आचरण करावे, यास्तव मी हे
सारे केले आहे.''[७] जनतेत निरर्थक यज्ञयाग व पूजाविधी याबाबत असणारी भ्रामक भिती व अनाठाई खर्चाची पध्दत यावर
सम्राट अशोक ताशेरे ओढतो. प्रवास सुरक्षित होण्यासाठी किंवा आजारातून बरे होण्यासाठी केलेले विधी हे अशा विधिंवर
अवलंबून असणा-या क्षुद्र पुरोहीतांचा कमाईचा एक स्रोत आहे असे त्याचे स्पष्ट मत होते. सम्राट अशोक आपल्या दहाव्या

ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Historicity International Research Journal SPECIAL ISSUE
Contemporary History and Research Methodology

आलेखात विविध प्रसंगी केले जाणारे विधि टाळा असे स्पष्ट मत मांडतो. प्रत्येकाची ''पाप'' या शत्रू पासून सुटका झाली पाहीजे हे मतही तो मांडतो. बाराव्या आलेखात पंथभेद नष्ट करून विविध पंथामध्ये ऐक्य प्रस्थपीत व्हावे अशी अपेक्षा तो व्यक्त करतो. सम्राट अशोक आपल्या तेराव्या शिलालेखात कलिंग युध्दात झालेला नरसंहाराबाबत त्याने पश्चाताप व्यक्त केलेला आहे. सर्व जनता माझी मुले असून माझ्या मुलांप्रमाणे त्यांनाही इहपरलोकात सुखे मिळावीत. [८]

**संदर्भ सूची**

१. प्राचार्य गायधनी रं.ना.,फडके वासंती (अनुवाद) थापर रोमीला, दी पेंग्वीन हिस्ट्री ऑफ अर्लि इंडीया, व्दितिय आवृत्ती, के सागर पब्लिकेशन, पुणे, २००८, पृष्ठ क्र.२३४,२३५.
२. Dr.Ambedkar B.R. Writing and speeches.Vol.11 page No.229-245
३. कित्ता पृष्ठ क्र.२३३
४. प्राचार्य गायधनी रं.ना.,फडके वासंती (अनुवाद) थापर रोमीला, दी पेंग्वीन हिस्ट्री ऑफ अर्लि इंडीया, व्दितिय आवृत्ती, के सागर पब्लिकेशन,पुणे,२००८, पृष्ठ क्र.२३७
५. जोशी पी.जी., प्राचिन भारताचा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१०, पृष्ठ क्र.३११
६. थापर रोमीला, भारत का इतिहास, तेविसावी आवृत्ती, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, २००८, पृष्ठ क्र.७७,७८,
७. प्राचार्य गायधनी रं.ना. उपरोक्त पृष्ठ क्र.२३८
८. जोशी पी.जी., प्राचिन भारताचा इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१०, पृष्ठ क्र.३०८

■